लोकमत

# कोविड आणि परीक्षा विवाद





**प्रा. डॉ. सुखदेव थोरात**
माजी अध्यक्ष
विद्यापीठ अनुदान आयोग

**पदवीधर** व पदव्युतर विद्यार्थ्यांची परीक्षा पद्धत आणि मूल्यांकनाविषयी केंद्र व राज्य सरकार यांच्यात वाद निर्माण झाला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांच्या परिसरातील लेखी परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रेणी द्यावी की गेल्या वर्षाच्या/सत्राच्या सरासरीच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन व श्रेणीबद्ध करणे हा वादाचा विषय झाला आहे. केंद्र सरकारने सक्तीचा सल्ला दिला की, पुरेशा आरोग्य संरक्षणासह कॅम्पस परीक्षा राज्य सरकारने घ्यावी. परंतु, महाराष्ट्रासह काही राज्यांना वाटते की, कॅम्पसमध्ये परीक्षा घेण्यात तरुणांमध्ये कोविड पसरण्याचा धोका आहे. त्यांनी प्रा. कुहाड समितीच्या शिफारशीस अनुकूलता दर्शविली. ती अशी की, पुढील वर्ष/सत्रामध्ये बढतीसाठी व अंतिम वर्षाची पदवी बहाल करण्यासाठी गत वर्षाच्या वा सत्राच्या कामगिरीच्या आधारावर गुण द्यावेत. शिवाय गुणपत्रिकेत सुधारणा करण्यासाठी यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीच्या (कारकीर्द) नियोजनासाठी मुक्त केले जाईल. त्यावर राज्यांनी असा युक्तिवाद केला की, कोविडच्या घटना सर्वाधिक घडत असल्याने केंद्र सरकारने सुचविलेली ऑनलाईन व कॅम्पस परीक्षा घेणे, दोन्हीही महाराष्ट्रात गैरसोईच्या आहेत. राज्यांना असेही वाटते की, कॅम्पस परीक्षेत अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांची खरी गुणवत्ता प्रतिबिंबित होऊ शकणार नाही. या लेखात दोन्ही बाजूंचे युक्तिवाद तपासून मत व्यक्त केले आहे.

**ऑनलाईन व कॅम्पस परीक्षा :** ‘यूजीसी’ने निवडलेल्या आधारावर शिफारस केलेली सार्वत्रिक ऑनलाईन परीक्षा इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या कमी उपलब्धतेमुळे अनेक विद्यार्थी व शिक्षकांचे राज्यात समर्थन असलेले चित्र कठीण आहे. २०१८-१९ मधील एनएसएसओच्या सर्वेक्षणानुसार, ४२ टक्के शहरी कुटुंबात, तर केवळ १५ टक्केच ग्रामीण कुटुंबात इंटरनेट उपलब्ध आहे. म्हणून सार्वत्रिक ऑनलाईन परीक्षा हा उपाय नाही. मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांसाठी इंटरनेटचे अपुरे कनेक्शन्स असल्याचे आढळले. सर्वेक्षणात असे आढळले की, बरेच इंटरनेट डिस्कनेक्ट केले होते आणि काहींनी तर आर्थिक परिस्थितीमुळे मोबाईल विकलासुद्धा होता.

दुसरा पर्याय म्हणजेच विद्यार्थ्यांची उपस्थिती असलेल्या कॅम्पसमध्ये परीक्षा घेणेसुद्धा सुरक्षित होईल. असा युक्तिवाद केला जात आहे की, कॅम्पसमधील परीक्षा विद्यार्थी व शिक्षकांसाठीही दु:स्वप्नच असेल. देशातील विविध भागांतील लाखो विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील शहरांत आमंत्रित करणे म्हणजे विद्यापीठ व महाविद्यालये यांना कोविडचे केंद्र बनविणे होईल. शिवाय विद्यार्थी महाराष्ट्रात जाण्यासाठी इतर राज्यांमधून प्रवास करतात. ते मुख्यत: रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे त्यांना कोविडची लागण होणार नाही, याची शाश्वती नाही. परीक्षाकाळात परिसरातील संस्थेत त्यांचे राहणे धोकादायक असेल. ‘यूजीसी’ने सुचविलेले निर्देश खबरदाऱ्या घेतल्यानंतरही परीक्षा हॉलमध्ये अधिक धोका आहे. या स्थितीत परीक्षा घेणे चांगले नाही. विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे नुकसान परीक्षेतील लाभांपेक्षा अधिक असू शकते.

**खरी परीक्षा नाही :** ही असाधारण स्थितीसुद्धा गुणांच्या बाबतीत विद्यार्थ्यांची कामगिरी सुधारू शकणार नाही. या स्थितीतील परीक्षांचे परिणाम खरी गुणवत्ता प्रतिबिंबित करणार नाहीत. दिल्ली विद्यापीठासारख्या ऑनलाईन शिकविणाऱ्या काही विद्यापीठांमध्ये अनेक अडचणींमुळे उपस्थिती ५० टक्के होती. बरेच विद्यार्थी आता वसतिगृहात वा भाड्याने घेतलेल्या खोल्यांमध्ये आवश्यक पुस्तके व वाचनसामग्रीशिवाय त्यांच्या गावी राहतात म्हणून त्यांच्याकडे योग्य वाचनसामग्रीची कमतरता आहे. ते परीक्षेसाठी कसे तयार असतील? घरी अनुकूल वातावरणाचा अभाव आहे. काही कुटुंबे आजाराने किंवा आर्थिक आपत्कालीन परिस्थितीशी झुंज देत आहेत. नोकरी गमावणाऱ्यांवर सर्वांत जास्त वाईट परिणाम होत आहेत, ज्यात तात्पुरती मजुरी मिळणारे, करार नसलेले कामगार व छोट्या व्यावसायिकांचा समावेश आहे. राज्यात २०१७-१८ मध्ये अंदाजे एकूण पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४१ टक्के विद्यार्थी या तीन गटातील आहेत. यात सर्वाधिक प्रमाण अनुसूचित जमातीतील (६१ टक्के) विद्यार्थ्यांचे, अनुसूचित जाती (५५ टक्के), ओबीसी (४५ टक्के) व इतरांचे ३० टक्के आहे. त्यांच्या पालकांना जगण्याची तजवीज करण्यासाठी प्रचंड ताण येत आहे. संपूर्णत: विस्थापित झालेल्या स्थलांतरितांच्या विद्यार्थ्यांची परिस्थिती वाईट आहे. ते परीक्षेस परत येऊ शकणार नाहीत म्हणून या परिस्थितीत परीक्षा घेणे या वर्गाकरिता अन्यायकारक असेल. अशा विद्यार्थ्यांवर ते परीक्षा समाधानकारकपणे देण्याच्या स्थितीत नसल्याने त्यांच्यावर परिणाम होईल. ही परीक्षा योग्य गुणवत्तेची असेल याची शाश्वती नाही.

**योग्य उपाय :** कुहाड समितीने सुचविलेला योग्य पर्यायी दृष्टिकोन राज्य सरकारने स्वीकारला आहे, म्हणजे अंतिम वर्षाच्या तसेच इतर विद्यार्थ्यांना गत सत्रातील कामगिरीच्या सरासरीच्या आधारावर श्रेणी दिली जाईल. त्यांना मिळणाऱ्या गुणांमुळे, अशा भीतीग्रस्त वातावरणाने त्यांना परीक्षा देण्यास भाग पाडल्या जाणाऱ्या श्रेणीपेक्षा यथार्थवादी व उत्तम गुणवत्तेचे सूचक असेल. पदवीनंतर ज्यांना त्यांची शैक्षणिक विश्वासार्हता वाढविण्याची इच्छा आहे, त्यांना लवकर विशेष परीक्षेसाठी बदल प्रदान केला जाईल, जे की कुहाड समितीच्या अहवालानुसार सूचित केले आहे. हा एक उत्तम व निश्चित व्यवहार्य उपाय आहे, जो विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे जीवन धोक्यात न आणता, त्यांच्या गुणवत्तेची कमतरता न दाखविता विद्यार्थ्यांना न्याय देईल. केंद्र सरकारसाठी सर्वांत चांगला मार्ग म्हणजे राज्यांशी चर्चा करणे व सर्वसाधारण दृष्टिकोनातून निर्णय घेणे आणि निर्णय न लादणे. सर्व उच्च शिक्षण केंद्र व राज्यांच्या संयुक्त जबाबदारीसह समवर्ती यादीत आहे.

# कंत्राटी पद्धतीने प्राध्यापक भरती ?

## तासिका तत्त्वावरील भरती रद्दच : व्यवस्थापन परिषदेत निर्णय शक्य

**कोल्हापूर : सचिन टिपकुर्ले**

शिवाजी विद्यापीठात कंत्राटी पद्धतीने प्राध्यापक भरती होणार असून जुन्या लोकांनाच कायम करण्याची शक्यता आहे. याबाबत नेमलेल्या समितीची सोमवारी बैठक झाली. या समितीने आपली शिफारस व्यवस्थापन परिषदेला केल्याचे समजते. व्यवस्थापन परिषद याबाबत अंतिम निर्णय घेणार आहे. त्यामुळे किमान पदे भरण्याचा मार्ग सुकर होण्याची शक्यता आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडे आरक्षणाचे निकष प्राप्त न झाल्याने कंत्राटी पद्धतीने होणारी प्राध्यापक भरती बंद करून तासिका तत्त्वावर नेमणूक केली जाणार होती. महाविद्यालय व विद्यापीठात सध्या कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांपेक्षा जादा शिक्षकांची अध्यापनासाठी गरज असते. गेल्या अनेक वर्षापासून प्राध्यापक भरती बंद आहे. त्यामुळे अध्यापनाचे काम करण्यासाठी अतिरिक्त प्राध्यापकांची नियुक्ती ही महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवर शासन नियमानुसार होते. पण कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये व विद्यापीठे बंद आहेत. पण महाविद्यालये व विद्यापीठ सुरू झाल्यानंतर ही पदे भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. शासन आदेशाप्रमाणे महाविद्यालयात तासिका तत्त्वावर आहे त्या प्राध्यापकांना पुन्हा नेमण्यात येणार आहे. पण विद्यापीठातील प्राध्यापक नियुक्तीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. कंत्राटी की तासिका याबाबत निर्णय घेण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीची आज बैठक झाली. या बैठकीत कंत्राटी पद्धतीने भरती करण्याला मान्यता देण्यात आल्याचे समजते. तसेच सध्या काम करणाऱ्या प्राध्यापकांनाच आहे त्या पदावर पुन्हा नियुक्ती दिली जाण्याची शक्यता आहे. समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेला करण्यात येणार आहेत. व्यवस्थापन परिषद यानंतर अंतिम निर्णय देणार आहे.


Kolhapur Edition
Aug 11, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# कौशल्य अभ्यासक्रमातून आर्थिक स्त्रोतांसाठी प्रयत्न

## इन्व्हेस्टर असोसिएशन, शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम

कोल्हापूर, ता. १० : छोटी-मोठी कौशल्ये आर्थिक स्त्रोत बनू शकतात. त्यामुळेच कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन आणि शिवाजी विद्यापीठ यांनी संयुक्त उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तीन-सहा महिन्यांच्या छोट्या अभ्यासक्रमांतून आर्थिक स्त्रोत निर्माण होऊ शकतात. तेच करण्याचा प्रयत्न होत आहे. यातून कोरोनासारखी भयानक परिस्थिती आली तरीही सर्वसामान्यांचा आर्थिक स्त्रोत कायम सुरू राहील आणि येणारे नैराश्य बाजूला फेकले जाईल.

इन्व्हेस्टर असोसिएशन ही



जिल्ह्यातील गुंतवणूकदारांची संस्था आहे. शेअर मार्केटसह इतर गुंतवणुकीचे काम केले जाते. येथे शेअर मार्केट, म्युच्युअल फंडासह इतर गुंतवणुकीचे सल्ले दिले जातात. फसवणूक होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी, याचीही माहिती दिली जाते. अनेक वेळा सेमिनार घेऊन गुंतवणूकदारांना माहिती दिली जाते. नव्या गुंतवणुकीवेळी कोणती काळजी घ्यावी, यासाठी आवश्यक ते सल्ले दिले जातात. गुंतवणूक कशी आणि कोठे असावी? याची माहिती दिली जाते. मात्र, याला मोठे व्यासपीठ मिळावे, महाविद्यालयीनस्तरावर याची माहिती व्हावी, गृहिणी, वर्क फ्रॉम होम यातून कशा पद्धतीने नफा मिळविता येतो, याचे धडे देण्याचा

पान २ वर »

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिदिन साजरा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणाहुती देणाऱ्या क्रांतिवीरांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतिवन येथील हुतात्मा स्मारकास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आत्मबलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांप्रती आदरांजली व कृतज्ञ भावना व्यक्त करण्यात आली. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी यावेळी कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा...' या कवितेचे भावपूर्ण वाचन केले. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एस. बी. महाडिक, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ अधिविभाग प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील प्रवेश प्रक्रिया प्रगतिपथावर असून, विद्यापीठातील विविध विभागांची माहिती वेबसाईटवर दिली जात आहे. कोरोनामुळे सध्या महाविद्यालये, विद्यापीठ बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विद्यापीठात कोण कोणते कोर्स हे वेबसाईटवर सांगितले जात आहेत.

Kolhapur Edition
Aug 11, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# कौशल्य अभ्यासक्रमातून आर्थिक स्त्रोतांसाठी प्रयत्न

» पान १ वरून

मानस असोसिएशनने व्यक्त केला. तत्कालीन अध्यक्ष मनीष झंवर यांनी शिवाजी विद्यापीठाशी संपर्क साधून अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न केला. शिवाजी विद्यापीठाने मंजुरी दिली असून, हे अभ्यासक्रम किती आणि कशा पद्धतीचे असावे, याबाबत सुसूत्रता आणण्याचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. सध्या कुलगुरू बदलल्यामुळे आणि कोरोना महामारीमुळे हे काम अर्धवट राहिले आहे. अधिक विद्यार्थ्यांना, गृहिणींना, बेरोजगारांना कौशल्य विकासावर आधारित शिक्षण देऊन त्यांच्या अर्थार्जनाचा मार्ग खुला करण्याचा प्रयत्न इन्व्हेस्टरर्स असोसिएशनचा आहे. तो सफल होण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील काही प्राध्यापकांनी प्रयत्न केले, मात्र यश आलेले नाही. विद्यापीठाने यात लक्ष घातल्यास अभ्यासक्रम सुरू होऊ शकतात.